# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय, कार्यालय मुंबई.

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर ,
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई ५१.
फोन नं.२६४७ ४८९२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६१९
Email- jtdirrom@gmail.com Website – http:/jdteromumbai.com


**कार्यालयीन आदेश**

क्र.४/विकामुं/तंशि/पार्श्वनाथ/स्थलांतर/२०१३/ १९९
दिनांक 15 JAN 2013

प्रति,
प्राचार्य,
सर्व संबंधीत संस्था (सोबतच्या यादी प्रमाणे)

विषय :- पार्श्वनाथ चॅरीटेबल ट्रस्टचे, पार्श्वनाथ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ,कासारवडवली, घोडबंदर रोड, ठाणे या संस्थेतील विद्यार्थ्यांना अन्य संस्थेत स्थलांतरीत करणेबाबत

संदर्भ :- १ . संचालक, तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र
क्र. २/एनजीसी /२०१२/२०९२ दिनांक १९/डिसेंबर/२०१२
२. महाराष्ट्र शासन , उच्च व तंत्रशिक्षण विभाग मंत्रालय, मुंबई -३२ यांचे
पत्र क्रमांक टीईएम/२०१२/प्र.क्र.८७/तांशि-४ दिनांक २८/डिसेंबर/२०१२
३. संचालक, तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे
पत्र क्र. २/एनजीसी /२०१२/२१३६ दिनांक ३१/डिसेंबर/२०१२
४. या कार्यालयाचे आदेश क्रमांक क्र.४/विकामुं/तांशा/पार्श्वनाथ स्थलांतर/२०१२/५५
दिनांक ०३/जानेवारी /२०१३ , ७४ दिनांक ०५/जानेवारी /२०१३
व १२७ दिनांक १०/जानेवारी /२०१३

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत नमुद करण्यात येते की ,पार्श्वनाथ चॅरिटेबल ट्रस्टचे पार्श्वनाथ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग , कासारवडवली , घोडबंदर रोड, ठाणे, या संस्थेतील विद्यार्थ्यांना मुंबई विद्यापीठातील इतरत्र अन्य खाजगी विनाअनुदानीत संस्थेमध्ये( कमाल ८ विद्यार्थ्यांना )स्थलांतरण करण्याबाबत या कार्यालयाने संदर्भिय क्रमांक ४, ५, व ६ अन्वये आदेश निर्गमित केले आहेत. सदर आदेशानुसार **डी. जे. संघवी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, विलेपार्ले, मुंबई या संस्थेमध्ये** विद्यार्थ्यांना स्थलांतरीत करण्याबाबत आदेश देण्यात आले होते.

उपरोक्त संस्थेमध्ये स्थलांतरीत केलेल्या विद्यार्थ्यांनी सदर संस्थेमध्ये प्रवेश घेण्यासाठी संपर्क केला परंतू संस्थेने विद्यार्थ्यांना प्रवेश दिला नाही त्यामुळे विद्यार्थी / पालकांनी सदर संस्थाबदल करून मिळण्याबाबत विनंती अर्ज या कार्यालयास सादर केले आहेत. तरी उपरोक्त संस्थेमध्ये स्थलांतरीत केलेल्या विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम पुर्ण करणेसाठी विद्यार्थ्यांचे हीत लक्षात घेऊन **इतरत्र अन्य संस्थेमध्ये सोबत जोडलेल्या विवरणपत्रामध्ये नमुद संस्थांमध्ये कमाल ८ मर्यादेपेक्षा जादा विद्यार्थ्यांना एक विशेष बाब म्हणून** त्यांनी दिलेल्या विकल्पानुसार व गुणवत्तेनुसार खालील अटि व शर्तीनुसार संस्था स्थलांतराने प्रवेश देण्याचे या कार्यालयामार्फत निर्देश देण्यात येत आहे.

१ शैक्षणिक वर्ष २०१२-१३ चे उर्वरित शैक्षणिक कामकाज जसे सत्र कार्य पुर्ण करुन घेणे, परीक्षा अर्ज स्विकारणे इत्यादि बाबी स्थलांतरीत संस्थेमार्फत पुर्ण करण्यात यावे .पुढील शैक्षणिक सत्रात अधिकचे वर्ग झाल्यास संबंधीत संस्थेने विद्यापीठाशी संपर्क साधून तसे अधिकच्या वर्गाचे आयोजन करावे.

२ सद्यस्थितीत प्रथम सत्र पुर्णत्वाच्या मार्गावर असल्याने त्याप्रमाणात त्यांची शैक्षणिक शुल्क इत्यादि वजाती करुन उर्वरित शुल्क विद्यार्थ्यांना पार्श्वनाथ चॅरीटेबल ट्रस्टचे, पार्श्वनाथ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कासारवडवली, घोडबंदर रोड, ठाणे या संस्थेने परत करावी .

३ स्थलांतरीत केलेल्या संस्थेचे लागू असलेले शैक्षणिक शुल्क वर नमुद केलेल्या प्रमाणात शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून नियमानुसार विद्यार्थ्यांना स्थलांतरीत संस्थेत भरणे आवश्यक राहील .तसेच त्यांना शैक्षणिक सवलती मिळत असल्यास यापुढेही सुरु राहतील .(मागास वर्गीय विद्यार्थी, टी.एफ.डब्ल्यु.एस. अंतर्गत )

४. अनुतीर्ण विद्यार्थ्यांचे स्थलांतर विद्यापीठाच्या नियमांच्या अधिन राहून करण्यात येत आहे. आपल्या संस्थेमध्ये स्थलांतरीत केलेल्या विद्यार्थ्यांपैकी जे अनुत्तीर्ण (ATKT नसलेल्या/ड्रापआऊट)आहेत अशा विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज हे आपल्या संस्थेमार्फत स्विकारुन विद्यापीठास सादर करावेत . तसेच अशा विद्यार्थ्यांना ते ज्या शैक्षणिक वर्षात विद्यापीठाच्या नियमानुसार पुढील वर्गात पात्र होतील त्या शैक्षणिक वर्षात अशा विद्यार्थ्यांना आपल्या संस्थेत प्रवेश निश्चित करावा. तसेच विद्यार्थ्यांचे मुळ कागदपत्रे आपल्या स्तरावर तपासून घेण्यात यावेत.

५. विद्यार्थ्यांचे ओळखपत्र , विद्यापीठाचा एनरोलमेंट क्रमांक ,सत्र परीक्षेच्या गुणपत्रिका , इत्यादि तपासून विद्यापीठाच्या पात्रतेनुसार सबंधीत वर्षात स्थलांतरीत करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश स्थलांतरीत केलेल्या संस्थेने निश्चित करण्यात यावे .

६.जे विद्यार्थी पुर्विच्या संस्थेत प्रात्यक्षिक विषयात अनुत्तीर्ण आहेत अशा विद्यार्थ्यांचे पुर्विच्या संस्थेत जे सत्र कार्य पुर्ण केले आहे , त्या विषयातील सत्र कार्याचा दस्ताऐवज प्राप्त करुन जतन करावा व प्रात्यक्षिक परिक्षेच्या वेळेस आवश्यकते नुसार परिक्षा घेण्यासाठी परिक्षकांना सादर करावा.

प्र सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

प्रत :- १. संचालक, तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य , मुंबई यांना संदर्भिय पत्रास अनुसरुन माहितीस्तव सादर

२. कुलसचिव , मुंबई विद्यापीठ , मुंबई यांना माहितीस्तव व पुढील कार्यवाहीसाठी सादर

३. मा. परिक्षा नियंत्रक ,मुंबई विद्यापीठ , महात्मा फुले भवन, विद्यानगरी, कलीना, सांताक्रुझ पुर्व मुंबई यांना माहितीस्तव सादर

४. प्राचार्य, पार्श्वनाथ चॅरीटेबल ट्रस्टचे, पार्श्वनाथ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ,कासारवडवली, घोडबंदर रोड, ठाणे यांना कळविण्यात येते की, त्यांनी विद्यार्थ्यांना तात्काळ आवश्यक ती गुणपत्रीका व कागदपत्रे द्यावीत, विद्यापीठासबंधीत कागदपत्रे /विद्यार्थ्यांनी यापुर्वि केलेले सत्र कार्य अहवाल निकालाची प्रत इत्यादि संपुर्ण तपशिलासहीत सबंधीत संस्थांना देण्यात यावीत व आवश्यक ती कार्यवाही करावी . तसेच चालू शैक्षणिक वर्ष २०१२-१३ मध्ये द्वितीय /तृतीय तसेच अंतिम वर्षास (चतुर्थ वर्ष) प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे प्रथम सत्र पुर्णत्वाच्या मार्गावर असल्याने त्याप्रमाणात त्यांची शैक्षणिक शुल्क इत्यादि वजाती करुन उर्वरित शुल्क विद्यार्थ्यांना परत करावे

५ . संबंधीत विद्यार्थी ( सहसंचालकांच्या www.jdteromumbai.com संकेतस्थळावर उपलब्ध ) त्यांना कळविण्यात येते की , त्यांनी तात्काळ संबंधीत स्थलांतरीत संस्थेत प्रवेश घ्यावा . कोणत्याही विद्यार्थ्यास पनश्चः संस्थाबदल करुन देण्यात येणार नाही. सबंधीत संस्थेमध्ये मुदतीत प्रवेश न घेतल्यामुळे त्याचे शैक्षणिक नुकसान झाल्यास सर्वस्वी जबाबदारी विद्यार्थ्यांची राहील याबाबत नोंद घ्यावी .

D/Parshwanath /Parshwananath

**Revised Order : -** **Date : 14/01/2013**

**Sub:- Change of allotment from D.J.Sanghvi College of Engg., Vileparle ( EN 3199 ) to other Unaided College**

| Sr.No | Name of the candidate | Year & Course | Alloted Institute | Allotted Institute |
|---|---|---|---|---|
| 1 | Shah Parth Krishna | S.E. Mech | **EN 3201** | **RIZVI COLLEGE OF ENGG, BANDRA** |
| 2 | Shah Kunj Rakesh | S.E. Mech | **EN 3201** | **RIZVI COLLEGE OF ENGG, BANDRA** |
| 3 | Pipalia Smit Nalin | S.E. Mech | **EN3135** | **Rajiv Gandhi Institute of Technology, Andheri** |
| 4 | Shah Mayur Himmat | S.E. Mech | **EN3135** | **Rajiv Gandhi Institute of Technology, Andheri** |
| 5 | Unagar Astik Vijay | T.E. I.T. | **EN3135** | **Rajiv Gandhi Institute of Technology, Andheri** |
| 6 | Sojitra Sanket Masukhbhai | T.E. I.T. | **EN3135** | **Rajiv Gandhi Institute of Technology, Andheri** |
| 7 | Seth Swati Hareshbhai | T.E. I.T. | **EN3135** | **Rajiv Gandhi Institute of Technology, Andheri** |
| 8 | Nipane Yogesh Vitthal | B.E. Comp. | **EN3135** | **Rajiv Gandhi Institute of Technology, Andheri** |
| 9 | Shah Anish Jawahar | B.E. Comp. | **EN3135** | **Rajiv Gandhi Institute of Technology, Andheri** |
| 10 | Jain Yugshresth Rakesh | T.E. I.T. | **EN3139** | **VIDYALANKAR INSTITUTE OF TECH.,WADALA** |
| 11 | Shah Purav Harshad | S.E. Mech | **EN3181** | **K.J.Somaiya College Of Engg., Vidhavihar** |
| 12 | Kamdar Kushal Jayendra | S.E. Mech | **EN3181** | **K.J.Somaiya College Of Engg., Vidhavihar** |
| 13 | Shah Yash Harshad | B.E. Comp. | **EN3182** | **THADOMAL SHAHANI ENGG. COLLEGE, BANDRA(W)** |
| 14 | Kothari Viral Suryakant | B.E. Comp. | **EN3182** | **THADOMAL SHAHANI ENGG. COLLEGE, BANDRA(W)** |
| 15 | Shah Keyur Prathmesh | T.E. Comp. | **EN3182** | **THADOMAL SHAHANI ENGG. COLLEGE, BANDRA(W)** |
| 16 | Mehta Jay Deepak | S.E. Mech | **EN3194** | **Vidhyavardhani's College of Engg.(Vasai)** |
| 17 | Shah Jay Dipakbhai | S.E. Mech | **EN3194** | **Vidhyavardhani's College of Engg.(Vasai)** |
| 18 | Ranade Saheel Vilas | T.E. Elex. | **EN3194** | **Vidhyavardhani's College of Engg.(Vasai)** |
| 19 | Mehata Jinal Rameshbhai | T.E. Elex. | **EN3203** | **ATHARVA COLLGE OF ENGG., MALAD** |
| 20 | Panchal Viral Bharat | T.E. I.T. | **EN3204** | **ST.FRANSIS INSTITUTE OF TECH., BORIVALI** |
| 21 | Shah Nisarg Harsh | T.E. I.T. | **EN3204** | **ST.FRANSIS INSTITUTE OF TECH., BORIVALI** |
| 22 | Shah Payal Anil | T.E. I.T. | **EN3204** | **ST.FRANSIS INSTITUTE OF TECH., BORIVALI** |
| 23 | Sanchala Mihir Pravin | T.E. I.T. | **EN3204** | **ST.FRANSIS INSTITUTE OF TECH., BORIVALI** |
| 24 | Ajmera Priyanka Kirit | T.E. Elex. | **EN3215** | **SARDAR PATEL COLLEGE OF ENGG., ANDHERI, (UN-AIDED)** |
| 25 | Nandawat Ankur Suresh | S.E. Elex. | **EN3215** | **SARDAR PATEL COLLEGE OF ENGG., ANDHERI, (UN-AIDED)** |

for Joint Director
Technical Education, Mumbai region
Mumbai